तरुण भारत

गुरुवार, २७ डिसेंबर २०१८

# अखंड भारत संकल्पना मराठ्यांची

## ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन




कोल्हापूर : व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना डॉ. सदानंद मोरे. सोबत अशोकराव पवते, डॉ. एस. एन. पवार, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील.

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठ्यांची राजकीय व प्रशासकीय जमात असल्याने, भारतात मराठेशाहीनेच राष्ट्र भावना निर्माण केली. त्यामुळे भारत व महाराष्ट्राच्या इतिहासाची व्याप्ती फार मोठी आहे. या इतिहासाकडे समग्र दृष्टीने पाहण्याची गरज आहे. कारण अखंड भारत ही संकल्पना मराठ्यांची होती, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष व ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक क्रांतीवीर रंगरावदादा पाटील यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त ताराराणी विद्यापीठाच्यावतीने आयोजित व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. यावेळी 'महाराष्ट्राचे इतिहास लेखन' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.

डॉ. मोरे म्हणाले, फोरेन्स नाईट टिंगलला हिंदुस्थानात मुंबई प्रांतात काम करावे, असा सल्ला हंटरने दिला होता. १७६१ च्या युद्धा अगोदर रघुनाथराव पेशव्यांनी अब्दालीला भारताबाहेर घालवले होते. पाणीपतच्या तिसऱ्या युध्दाच्या पराभवानंतर अब्दालीने थोरले माधवराव पेशवे यांना दुतामार्फत पत्र पाठवून मराठ्यांचे व अब्दालीचे वैर नाही, असे सांगितले. तिसऱ्या युद्धानंतर पुन्हा रजपूतांनी त्यांना बोलावणे पाठवले. पण अब्दालीचा मुलगा तौमुर पुन्हा भारतात आला नाही. एवढी महाराष्ट्राच्या व भारताच्या इतिहासाची व्याप्ती आहे. त्यामुळे या इतिहासाकडे समग्र दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, भारतीय इतिहासात मरठ्यांनी बजावलेल्या भूमिकेला न्याय मिळाला नाही. याला टॉरसारखे काही परकीय इतिहासकार कारणीभूत आहेत. भारताचा तीन चतुर्थांश भाग जिंकूणही मराठे उपेक्षितच राहिले. म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासाची दुरूस्ती करण्याची गरज आहे. जोपर्यंत महाराष्ट्रातील जाज्वल इतिहासाला बाहेर पोहचवले जात नाही, तोपर्यंत त्याची किंमत जगाला कळणार नाही. कारण छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांची कधीच भेट झाली नाही. सद्य स्थितीत जातीय पद्धतीने इतिहास लिहीला जात असल्यामुळे त्याची मांडणी आणि पुनर्मांडणी करण्याची गरज आहे.

आझाद नायकडी यांनी पोवाडा सादर केला. डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी सुत्रसंचालन केले. एस. डी. चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, प्रा. अनिल घस्ते आदी उपस्थित होते.